


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ८ डिसेंबर, १९४८ | अंक ४७

## बँक ऑफ पूना लि.

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | २५,००,००० |
| वसूल भांडवल | १२,५०,००० |

**संचालक मंडळ**

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया–चेअरमन, २ शेठ डी. आर. नाईक, जे. पी. (व्हा. चेअरमन), ३ डॉ. ना. भि. परुळेकर एम. ए., पीएच. डी., संचालक–सकाळ, ४ शेठ फ्रामजी पी. पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी (सोलापूर), ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, ७ शेठ गणपतराव काळूराम नाईक, बी. एससी., बी.ई.,एलएल. बी.

**मुख्य ऑफिस--४५५, रविवार, पुणें**


शाखा:—(१) भवानी पेठ, (२) सदाशिव पेठ, पुणें २, (३) सोलापूर, (४) सांगली.

हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांवर ड्राफ्ट्स व हुंड्या दिल्या जातात.

आपल्याजवळच्या पैशाचा योग्य मोबदला या बँकेच्या निरनिराळ्या योजनेनें घ्या. सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.

विशेष माहितीकरितां लिहा—

गो. ग. साठे, ए. बी. आय. (लंडन), मॅनेजर



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी







तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**प्राचीन वनस्पतींचें संशोधन**—आर्थिक दृष्ट्या मौल्यवान असणाऱ्या, नेपाळमधील प्राचीन वनस्पतींचें संशोधन करण्यासाठी डॉ. जानकी अम्मल ह्या नेपाळला गेल्या आहेत. त्या इंग्लंडच्या रॉयल हॉर्टिकल्चरल सोसायटीच्या खनिजज्ञ आहेत. चीनमधील आणि काश्मीरमधील प्राचीन वनस्पतींच्या जाती स्थलांतर करता करता नेपाळांत आल्या आहेत, असें त्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें. डॉ. जानकी अम्मल ह्यांना हिंद सरकारकडून हें संशोधन करण्याची विनंति करण्यांत आली आहे.

**रबराची निर्मिति**—बंगलोरला इंडिअन रबर बोर्डाची चौथी साधारण सभा भरली होती. ह्या सभेंत, हिंदुस्थान रबराच्या निर्मितींत स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें १५ कोटी रुपयांच्या एका योजनेचा विचार करण्यांत आला. देशांतील रबराचें सध्याचें उत्पादन १६ हजार टन आहे, तें पांच वर्षांच्या अवधींत ४०,००० टनांपर्यंत नेण्यासाठी उपाय करण्यांत यावेत, असें सुचविण्यांत आलें.

**खनिजांचा शोध**—मुंबई प्रांत, कच्छ, सौराष्ट्र आणि राजपुताना ह्या पश्चिम हिंदुस्थानच्या भागांत खनिज तेल, लोखंड आणि बॉक्साइट ह्यांचें संशोधन करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. बेळगांव जिल्ह्यांत बॉक्साइट, चुनखडी, लोखंडाची माती, इत्यादींचा शोध करण्यांत येणार आहे. गुजराथेंत खेड्यांतील पाणीपुरवठ्यासाठी सल्ला देण्यांत येणार आहे. राजपुतान्यांत जोधपूर आणि बिकानेर ह्या संस्थानांतून पाण्याचा शोध करण्यांत येणार आहे. जयपूरमधील जुन्या तांब्याच्या खाणी पुन्हां चालू करता येतील काय, ह्याबद्दलही तपास होणार आहे.

**न्यूयॉर्कमध्यें हिंद सरकारचा इमला**—हिंद सरकारनें न्यूयॉर्कमधील एक प्रसिद्ध इमारत आपल्यासाठी ३,५०,००० डॉलर्सला विकत घेतली आहे. हिंद सरकारच्या अमेरिकेंतील नोकरांना रहाती जागा पुरविण्यासाठी सरकारला बरीच मोठी रक्कम भाड्यापायीं भरावी लागते, ती ह्यापुढें वाचेल. नवीन इमारत खरेदी करण्यांत झालेला खर्च अशा रीतीनें १० वर्षांत भरून निघेल असा अंदाज आहे. इमारत पांच मजली आहे.

**पेट्रोल वांटपासाठी सल्लागार समिति**—बृहन् मुंबईतील पेट्रोल वांटपाच्या प्रांतिक अधिकाऱ्यांना दैनंदिन सल्ला देण्यासाठी मुंबई सरकारनें एक स्टॅंडिंग कमिटी नेमली आहे. कमिटीची बैठक दर तीन महिन्यांनीं एकदां होणार आहे. पेट्रोल पुरवठा व वांटप ह्यासंबंधीं निरनिराळ्या हितसंबंधांच्या हक्कांचा विचार करून त्याचें योग्य वांटप करण्याविषयीं कमिटी सल्ला देणार आहे. गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी श्री. कुंटे हे कमिटीचे अध्यक्ष आहेत.

**पूर्व बंगाल मधील शेड्यूल्ड बँका**—पूर्व पाकिस्तानांतील शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या ठेवींपैकीं ७० टक्के रक्कम पाकिस्तानांतच गुंतवावी अशी सूचना देणारा वटहुकूम पूर्व बंगालचें सरकार काढणार आहे, असें समजतें.

**अन्न व शेती संघटना**—जागतिक अन्न व शेती संघटनेच्या अंदाजपत्रकाच्या शेकडा ४·२५ टक्के येवढी वर्गणी सध्या हिंदुस्थानला द्यावी लागते. हिंदचे प्रतिनिधी श्री. एन्. जी. अभ्यंकर ह्यांनीं, हिंदुस्थानचा व पाकिस्तानचा वाटा प्रत्येकी ३·९५ टक्के असावा अशी मागणी केली आहे.

**टेलिफोनचे दर**—सध्या मुंबईंत घरीं फोन असला तर प्रत्येक फोनसाठी वार्षिक २७० रुपये आणि कचेऱ्यांतील फोनसाठी ४३५ रुपये भरावे लागतात. ता. १ फेब्रुवारी, १९४९ पासून असा फरक न करता प्रत्येक टेलिफोनमागे वार्षिक १४४ रुपये सरसकट भरावे लागतील. मात्र वरील रकमेशिवाय प्रत्येक कॉलसाठी १॥ आणा वेगळा द्यावा लागेल. ह्या पद्धतीमुळें 'कस काय आहे' विचारण्यासाठीच होणारे कॉल्स कमी पडतील, अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे.

**पाकिस्तानसाठी इंग्लंडचें कापड**—पाकिस्तानला लवकरच एका ब्रिटिश कंपनीकडून ८,५०,००० वार कापड मिळणार आहे. कापडांत पॉपलिन, ड्रिल, शर्टिंग वगैरे जातींचें कापड आहे. पूर्व पाकिस्तानचा ह्या कापडांतील वाटा मागाहून ठरविण्यांत येणार आहे.

**१९४८-५३ चें कर्ज परत**—१९४८-५३ च्या मुदतीच्या ४ टक्के व्याजाच्या कर्जाचा उर्वरित भाग ता. १५ डिसेंबर १९४८ रोजीं परत करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. त्या तारखेपासून ह्या कर्जावरील व्याज चालू रहाणार नाहीं.

**इंग्लंड-इजिप्त वाटाघाटी**—सध्या इंग्लंड आणि ईजिप्त ह्यांच्यांतील गंगाजळीबाबतचा करार ह्या वर्षअखेर संपत आहे. ह्या करारान्वयें ब्रिटननें ३,२०,९०,००० पौंड ईजिप्तला दिले होते. ईजिप्तच्या इंग्लंडकडे येणें असलेल्या पौंडांबाबत हाच करार पुढें चालू करण्यासाठी चालू महिन्यांत वाटाघाटी होणार आहेत असें समजतें.

**ऑक्टोबर महिन्यांत संप वाढले**—सप्टेंबर १९४८ च्या मानानें ऑक्टोबर महिन्यांत मुंबई प्रांतांतील औद्योगिक शहरांतून संपाचें प्रमाण वाढल्याचें आढळून आलें आहे. ऑक्टोबर महिन्यांत एकूण ५० औद्योगिक तंटे झाले. ह्या तंट्यांत ४८,२७६ लोकांनीं भाग घेतला आणि त्यामुळें १०,१,९२९ कामाचे दिवस फुकट गेले. सगळ्यांत अधिक तंटे कापड गिरण्यांतून झाले. एंजिनिअरिंगच्या कारखान्यांतून ६ तंटे झाले आणि इतर उद्योगधंद्यांतून २५ झाले. उरलेले १९ तंटे कापड गिरण्यांतून झाले.

**उद्योगधंद्यांच्या परिस्थितीची चौकशी**—मुंबई सरकारनें एक पत्रक काढून, उद्योगधंद्यांतील परिस्थितीची चौकशी करणाऱ्या चौकशी-कमिटीचें अधिकार-क्षेत्र वाढविलें आहे. सरकारच्या नवीन हुकुमाप्रमाणें वीज उत्पन्न करणाऱ्या व वाटणाऱ्या कारखान्यांचीहि चौकशी आतां कमिटी करणार आहे.

**सुरतमधील गिरण्यांतील तंटा**—सुरतमधील ३४ कापडाच्या कारखान्यांनीं औद्योगिक कोर्टानें ठरविल्याप्रमाणें पगार व बोनस देण्याचें कबूल केलें होतें. ह्या कारखान्यांतून १,५०० कामगार काम करतात. आतां कारखान्यांच्या मालकांनीं हायकोर्टाकडे अर्ज करून औद्योगिक कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी स्थगित करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. मालकांच्या मतानें असे प्रश्न औद्योगिक कोर्टाच्या अधिकाराच्या कक्षेंत येत नाहींत.

# अर्थ

बुधवार, ता. ८ डिसेंबर १९४८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## युद्धकाळांतील आपलें राष्ट्रीय उत्पन्न

### आवश्यक असलेलें भांडवल कोठून येणार ?

दुसऱ्या महायुद्धानंतर एकंदर चलनवाढीमुळें व राहाणीचें मान तीन ते चार पट वाढल्यामुळें हिंदुस्थानचें उत्पन्न वाढलें आहे कीं काय असा एखाद्यावेळीं भास होतो. परंतु दरमाणशी खरें उत्पन्न १९४२–४३ चे सालांत थोडेंसें वाढलें, तरी त्यानंतर तें घटत गेलें व महायुद्धानंतरच्या काळांत अखंड हिंदुस्थानचें वार्षिक उत्पन्न १९३१–३२ च्या वार्षिक उत्पन्नाच्या अंदाजाशीं तुलना करतांना एकंदरींत कमीच झालें असावें असा निष्कर्ष ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें काढला आहे. १९३१–३२ च्या मानानें अखंड हिंदुस्थानचें वार्षिक उत्पन्न कसें घटत आहे हें दाखविणारी विचारसरणी येथें थोडक्यांत स्पष्ट केली आहे.

डॉ. व्ही. के आर. व्ही. राव यांच्या अंदाजाप्रमाणें १९३१–३२ चें अखंड हिंदुस्थानचें वार्षिक दर माणशीं सरासरी उत्पन्न रु. ६५ होतें. त्याच पद्धतीच्या विचारसरणीनुसार युद्धापूर्वी म्हणजे १९३९–४० सालीं वार्षिक दर माणशीं सरासरी उत्पन्न रु. ६७ होतें व १९४५–४६ सालीं तें फक्त रु. ६३ होतें असा अंदाज आहे. म्हणजे, दर माणशीं वार्षिक उत्पन्न रु. ४ नीं घटलें असावें असा अंदाज आहे. अर्थात १९४६ नंतर एकंदर उत्पन्नाच्या परिस्थितींत, व म्हणून दर माणशीं वार्षिक सरासरी उत्पन्नांत वाढ झाली असणें संभवनीय नाहीं हें शेती व औद्योगिक परिस्थितीच्या अनुरोधानें खरें आहे. हा सर्व अंदाज अखंड हिंदुस्थानबद्दलचा आहे. पाकिस्तान वगळल्यास हिंदच्या उत्पन्नाचा आकडा किंचित् जास्त असणें संभवनीय आहे.

अखंड हिंदुस्थानचें औद्योगिक उत्पन्न १९३९–४० सालीं ३७९ कोटी रुपये होतें, तें १९४५–४६ सालीं १०३३ कोटी ८० लक्ष रुपये झालें असा अंदाज आहे. दर माणशीं औद्योगिक उत्पन्नाचे आंकडे ह्या अंदाजाप्रमाणें ११८ व ३०४ रुपये ह्याप्रमाणें अनुक्रमें आहेत. परंतु ह्या काळांत मुंबई शहराचा राहाणीचा निदर्शक आंकडा १९३९–४० चा १०० धरला तर १९४५–४६ सालचा २१९ झाला होता हें लक्षांत घेतां उत्पन्न विशेष वाढलें असें म्हणतां येत नाहीं. तुलनात्मक दृष्ट्या राहणीचें वाढतें मान जमेस धरलें असतां, उत्पन्नांत वाढ फार तर १६ टक्के झाली असावी. एकंदर वार्षिक उत्पन्नाच्या प्रमाणाशीं तुलना करतांना औद्योगिक उत्पन्न १९३९-४० सालीं २० टक्के होतें तर १९४५–४६ सालीं तें २४ टक्के झालें. त्यावरून औद्योगिक उत्पन्नाचें प्रमाण एकंदर सामुदायिक उत्पन्नांत चार टक्क्यांनीं वाढलें असावें असें अनुमान निघतें.

१९३९–४० सालीं शेतीच्या उत्पन्नाचा आकडा ९५२ कोटी रुपये होता, तर १९४५–४६ सालीं शेतीच्या उत्पन्नाचा आंकडा २२२४ कोटी रुपये झाला असावा. ह्याच वर्षांचे इतर उत्पन्नाचे आंकडे अनुक्रमें ६०२ कोटी रुपये व ९७९ कोटी रुपये होते. औद्योगिक, शेती व इतर सर्व तऱ्हेचें उत्पन्न समुच्चयानें विचारांत घेतलें असतां १९३९-४० सालीं तें १९३५ कोटी रुपये होतें तर १९४५-४६ सालीं तें ४२३८ कोटी झालें. ह्या दरम्यानच्या काळांत लोकसंख्येची वाढ २ कोटींनीं झाली असावी-ही सर्व परिस्थिति विचारांत घेतां, व राहणीच्या मानाच्या वाढीचा आंकडा लक्षांत घेऊन व त्याबद्दल योग्य ती वजावट केली असतां, १९३९-४० चें सरासरी दरमाणशीं वार्षिक उत्पन्न ६७ रुपये धरलें असतां १९४५-४६ चें तेंच उत्पन्न ६३ रुपये झालें. म्हणजेच दरमाणशी एकंदर वार्षिक उत्पन्न रुपये चारांनीं घटलें असा वरील आंकड्यांपासून निष्कर्ष दिसतो.

जर्मनी, जपान व इटली ह्या देशांव्यतिरिक्त इतर देशांची आर्थिक व औद्योगिक परिस्थिति हळू हळू सुधारत आहे. युरोपांतील देश ह्याप्रमाणें युद्धकालीन आर्थिक आपत्तीपासून आपली सुटका करून घेत आहेत. ब्रिटन, फ्रान्स, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया इ. देशांचें उत्पन्न युद्ध-पूर्व परिस्थितीशीं तुलना करतांना २० ते ४० टक्क्यांनीं वाढलें आहे, असें आकडे दर्शवितात. परंतु हिंदुस्थानची परिस्थिति मात्र चिंतनीय दिसते.

आर्थिक दृष्ट्या हिंद गरीब होत आहे असा निष्कर्ष वरील विचारसरणीवरून दिसून येतो. भांडवल संचय व नवीन उद्योगधंद्यांत भांडवलाची गुंतवणूक ह्याबद्दलची परिस्थिति गेलीं दोन वर्षें समाधानकारक नाहीं व दर माणशीं सरासरी वार्षिक उत्पन्न खरोखरच कमी होत असल्यास त्याचा पर्यायानें परिणाम भांडवल संचय व औद्योगिक परिस्थिति ह्यांच्यावर होणें संभवनीय आहे. आज उत्पादनांत वाढ करण्याची विशेष आवश्यकता आहे. अशा स्थितींत दर माणशीं सरासरी वार्षिक उत्पन्न घटणें ही गोष्ट सर्वच दृष्टींनीं विचार करण्यासारखी आहे.

युद्धकाळांत शेतकरी वर्ग थोडासा सावरला, कारखानदारांना पुष्कळ फायदा मिळाला, स्टर्लिंग बॅलन्सच्या रूपानें बराच पैसा इंग्लंडकडे जमा आहे, ह्या गोष्टी खऱ्या असल्या तरी अंतिम दृष्ट्या विचार करतां आर्थिक उन्नति साधण्याचा एक मार्ग म्हणजे दर माणशीं खरें सरासरी वार्षिक उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणें हा होय.

---

**दक्षिण हिंदुस्थानांत पोलादाचा कारखाना**—मद्रास सरकार आणि हिंदुस्थान सरकार ह्यांच्यांत, दक्षिण हिंदुस्थानांत एक लोखंडाचा कारखाना उभारण्यासंबंधीं पत्रव्यवहार चालू आहे. ही माहिती मद्रास सरकारचे उद्योगमंत्री श्री. रेड्डी ह्यांनीं प्रांताच्या वरिष्ठ विधिमंडळांत एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितली.

**बंगलोरजवळ मोठी डेअरी**—बंगलोरपासून १२ मैलांवर एक उत्तम प्रकारची दुधाची डेअरी काढण्याची योजना म्हैसूर सरकारनें मंजूर केली आहे. डेअरीसाठी गवत उगवणारी अशी ३,००० एकर उत्कृष्ट जमीन देण्यांत आली आहे. योजना अंमलांत आल्यापासून पांच वर्षांत डेअरींत १,००० दुभती जनावरें असतील असा अंदाज आहे.

## रस्ते करण्याचे रूळ

हिंदुस्थानांत, डिझेल एंजिनावर चालणारे, रस्ते करण्याचे रूळ करण्याच्या कारखान्याचा उद्घाटन समारंभ नुकताच झाला. हा कारखाना जेसॉप आणि कंपनीच्या मालकीचा असून तो डमडम येथें उभारण्यांत आला आहे. नागपूर रोड कॉन्फरन्समध्यें ठरल्याप्रमाणें युद्धोत्तर हिंदुस्थानांतील रस्ते करण्यासाठी वरील प्रकारचे रूळ कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत. नागपूर कॉन्फरन्स १९४३ मध्यें भरली होती. तथापि युद्धकालांत अशा प्रकारच्या कारखान्यासंबंधीं फारसें कांहीं करता आलें नाहीं. १९४६ सालीं हिंदुस्थान सरकारच्या विनंतीवरून एक रोड रोलर कमिशन हिंदुस्थानांत आलें. रूळ तयार करण्यासाठी उपलब्ध असलेल्या साधनांचा विचार करून कमिशननें शिफारसी केल्या. त्या शिफारसींना अनुसरूनच रूळ तयार करण्याचा कार्यक्रम आखण्यांत आला आहे. अशा रीतीनें दोन वर्षांच्या अल्प अवधींत कारखाना उभारला गेला. कमिशनच्या अहवालाचा विचार करून, हिंदुस्थान सरकारच्या उद्योग व पुरवठा खात्यानें वाफेच्या व तेलाच्या अशा दोन्ही प्रकारच्या रस्त्याच्या रुळांसाठी मागण्या नोंदविल्या. पैकीं तेलावर चालणाऱ्या रुळांची मागणी मेसर्स अव्हेलिंग बारफोर्ड लि. ह्या कंपनीकडे नोंदविण्यांत आली. ह्या रुळाचा नमुना अद्यावत् पद्धतीचा आणि हिंदुस्थानांतील परिस्थितीला जुळणारा असा मुद्दाम करण्यांत आला आहे. रूळ जेसॉप कंपनीनेंच बांधले असून कांहीं भाग मात्र इंग्लंडहून आयते मागविण्यांत आले. दरमहिना २० ते २५ रूळ तयार होतील असा अंदाज आहे. एकंदरीनें रूळ उत्तम कारागिरीचा नमुना ठरण्यासारखे असून जगांत कोठेही तयार झालेल्या रस्त्यांच्या रुळाशीं तुलनेला कमी पडणार नाहींत, असें म्हणतात.

## नोकऱ्यांसाठी अपुरे उमेदवार

मद्रास पब्लिक सर्व्हिस कमिशनचा १९४७-४८ सालाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्या अहवालावरून एक विशेष गोष्ट लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं. प्रांतिक सरकारच्या खात्यांतून ज्या नोकऱ्या असतात त्यांपैकीं किती कोठल्या जातीला द्यावयाच्या ह्याचें प्रमाण ठरलेलें आहे. तथापि फक्त एक जात सोडून इतर जातीबाबत असें आढळून आलें आहे, कीं त्या त्या जातीसाठी असणाऱ्या जागांपैकीं सर्व जागांना पुरेसे उमेदवारच पुढें आलेले नाहींत! लघुलेखक आणि टंकलेखक ह्यासारख्या कनिष्ठ प्रतीच्या जागा मिळण्यासाठी जितके किमान गुण मिळवावे लागतात ते ३० पासून १७ पर्यंत कमी करण्यांत आले. अशा हेतूनें कीं, मग तरी पुरेसे उमेदवार परीक्षेसाठी पुढें येतील. पण ह्या सवलतीचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. ह्याचा अर्थ कदाचित् असा असूं शकेल, कीं नोकऱ्यांत जातवारीचें प्रमाण ठेवण्याच्या पालिकडे आतां मद्रास प्रांत गेला आहे. सरकारी नोकरी मिळविण्यासाठी निरनिराळ्या जातींत ज्या आकांक्षा असतील त्यांच्याशीं सध्याचें जातवारीचें प्रमाण विसंगत असण्याचाही संभव आहे. तसें असेल तर हें जातवारीचें प्रमाण लवकर नष्ट केलेलें अधिक बरें असें म्हणावें लागेल. किंवा असेंही असेल कीं बहुतेक जातींतील तरुणांना सरकारी नोकरीपेक्षां इतर ठिकाणीं अधिक आकर्षक संधि मिळत असेल. तरी दोन्हींपैकीं कोठलेंही कारण असलें, तरी ती आनंदाचीच बाब समजली पाहिजे. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारनें नोकरीबाबतच्या नियमांत योग्य तो फरक करणें इष्ट आहे. हा फरक करतांना ज्यांना सरकारी नोकरीची गरज आहे आणि जे त्या नोकरीला योग्य आहेत, त्यांना जातीचा विचार न करतां निवडता येईल अशी दक्षता ठेवली गेली पाहिजे.

## विमा कायद्यांतील दुरुस्तीचें बिल

हिंदुस्थानांत सध्या अंमलांत असलेला विमा कायदा, मध्यवर्ती विधिमंडळाच्या येत्या अंदाजपत्रकाच्या अधिवेशनांत दुरुस्त करण्यांत येणार आहे. ह्या कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यासाठी जी अनौपचारिक समिति नेमण्यांत आली होती तिच्या बहुतेक सर्व शिफारसी विमा सल्लागार समितीनें मान्य केल्या आहेत. नवीन बिलांत इतर दुरुस्त्यांखेरीज देशाच्या फाळणीमुळें उत्पन्न झालेल्या प्रश्नांबाबतही स्वतंत्र दुरुस्त्या सुचविण्यांत येणार आहेत. ह्या प्रश्नांत फाळणीमुळें स्थलांतर केलेल्या विमा कंपन्यांचा एक प्रश्न महत्त्वाचा आहे. विमा संस्था ही एक उपयुक्त सामाजिक कार्य करीत असल्यामुळें, विमाकंपन्यांनीं सरकारशीं सहकार्य करणें जरूर आहे. विमा-कंपन्यांना स्वतःवरची जबाबदारी अधिक चांगल्या रीतीनें पाळता यावी आणि धंद्यांतील कांहीं अनिष्ट प्रकार बंद व्हावे म्हणून त्यांच्यावर सरकारी नियंत्रण असणें केव्हांही श्रेयस्कर आहे. नाहींतर विमेदार आणि भागीदार ह्यांच्या हितसंबंधांना धोका उत्पन्न होण्याचा संभव असतो. बिलांत ज्या नवीन दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या आहेत, त्यांत कांहीं दुरुस्त्या व्याख्या स्पष्ट करणाऱ्या अशा आहेत. उदाहरणार्थ, विमा उतरणारा, सरकारमान्य रोखे, बँकिंग कंपनी, चीफ एजंट, इत्यादी शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या कल्पना स्पष्ट केल्या नाहींत तर त्यांच्या अर्थांतून पळवाटा काढण्याची जी प्रवृत्ति गेल्या कांहीं वर्षांत दिसून आली तिला आळा बसणार नाहीं. सध्या विमा कंपन्यांचें मूल्यमापन दर पांच वर्षांनीं होतें; त्याऐवजीं तें दर तीन वर्षांनीं करण्यांत यावें अशी दुरुस्ती कायद्याच्या १३ व्या कलमांत सुचविण्यांत आली आहे. विमा कंपन्यांवर पैसे गुंतविण्याबाबत जीं बंधनें आहेत, त्यांतही दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे. सध्या कंपन्यांना सरकारी रोख्यांत २५ टक्के (विमा पत्रकांच्या जोखमीच्या) रक्कम गुंतवावी लागते. त्याऐवजीं सरकारी रोख्यांत २० टक्के आणि इतर सरकारमान्य रोख्यांत ३० टक्के गुंतविण्याची सवलत नवीन बिलान्वयें मिळणार आहे.



# NOTIFICATION

Shareholders of the Reserve Bank of India are informed that in accordance with Reserve Bank of India (Transfer to Public Ownership) Rules, 1948, compensation in the form of promissory notes and cheques is payable against the surrender of the share certificates accompanied by the prescribed form of application duly completed. Shareholders can obtain these forms from offices on and after the 6th December 1948. They are requested to complete the forms with due regard to the instructions printed on the reverse of the forms. The forms duly completed and the relative share certificates may be lodged with the appropriate office of the Reserve Bank of India on or after that date. The memorandum of deposit issue by the Bank should be retained by the shareholders or his agent for exchange against promissory notes and cheques after 1st January 1949.

Reserve Bank Of India,
Bombay,
1st December 1948

L. R. Bhandari
Manager.

## विक्री-करास प्रधानस्थान मिळण्याची शक्यता

### मद्रासी विक्री-कर वसुलीवरून मिळालेले निष्कर्ष

(२)

(श्री. स. वा. दातार.)

### समान दराची मागणी

विक्रीकराच्या वसुलीवरून प्रांताच्या व्यापारधंद्याच्या तेजी-मंदीचा अंदाज सहज बांधता येण्यासारखा आहे. प्रांताच्या आर्थिक भरभराटीची ही वसुली हें एक उत्कृष्ट गमक आहे. विक्रीकर हा मध्यवर्ती सरकारनें स्वतंत्र कायदा करून सर्व हिंदुस्थानभर एक-सूत्रीपणानें अंमलांत आणावा व त्यापासून मिळणारी वसुली यथाप्रमाण प्रांतांना वांटून द्यावी अशी सूचना वेळोवेळीं पुढें आली आहे. सध्यां प्रांतोप्रांतीं प्रांतिक सरकारांच्या आर्थिक गरजांप्रमाणें योग्य त्या दरानें त्यांनीं विक्रीकर बसविला आहे त्यामुळें त्याचे दरांत फार तफावत आहे; व त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नांतहि तफावत आहे. तेव्हां प्रांतिक सरकारांकडून वरील सूचनेंना पाठिंबा मिळणें कठीण आहे. सर्व हिंदुस्थानभर या कराची आकारणी समान पद्धतीवर व समान दरानें व्हावी ही मागणी मात्र अगदी रास्त आहे. निरनिराळ्या प्रांतांतील विक्री-कराची पद्धति व दर वेगवेगळे असल्यामुळें आंतरप्रांतीय व्यापारांत फार घोटाळे उत्पन्न होतात; सौकर्य नाहींसें होतें. आंतर-प्रांतीय व्यापाराचे ओघ स्थगित होण्यांत कोणत्याच प्रांताचा फायदा नाहीं. आपल्याला मिळणाऱ्या करवसुलींत घट होऊं नये अशी दक्षता प्रांतांनीं घेणें न्याय्यच होईल. परंतु तरीसुद्धां सर्व हिंदुस्थानभर सारख्याच दरानें व पद्धतीनें विक्री-कर आकारला जाणें अगत्याचें दिसतें.

### प्रधानस्थान

विक्री-कराची फलनिष्पत्ति पाहून छोटे छोटे, अल्पस्वल्प वसुलीचे अनेक चिल्लर कर अजिबात रद्द करण्यांत यावेत व जमीन-महसुलाचीहि अधिक तत्त्वशुद्ध पद्धतीवर आकारणी करावी अशा सूचना व कल्पना पुढें आल्या आहेत. पुढें-मागें विक्रीकराच्या वसुलीइतकीच प्राप्ती मोटारवाहतुकीच्या राष्ट्रीयीकृत धंद्यापासून होण्याचा दृढ संभव दिसतो. फक्त मद्रास शहरांतर्गत मोटारवाहतुकीच्या राष्ट्रीयीकृत धंद्यापासून पहिल्याच वर्षी घसारा, सरकारी कर व भरपूर राखीव फंड वजा करूनहि सुमारें २५ लाखांचें उत्पन्न यावें असा अंदाज आहे. यावरून प्रांतांतील सर्व वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण झाल्यावर विक्रीकराच्या वसुलाचे जवळपास या धंद्यापासून प्राप्ती होऊं शकेल. मग जमीनमहसुलावर सध्या असलेला भार सहज कमी करता येईल आणि गरीब शेतकऱ्याला सवलती देण्याची शक्यता होईल; इतकेंच नव्हे तर शेतीपासून पैदा झालेल्या मालावर सुलभपणानें व हलक्या माफक दरानें विक्री कराची आकारणी करण्याची योजना जर आंखतां आली तर जमीनमहसूल अजीबात रद्द करून टाकण्याचीहि शक्यता आहे. मात्र सध्यां देशांतील सर्व जमीन तत्त्वतः सरकारच्या मालकीची असल्याकारणानें कायद्याच्या दृष्टीनें जमिनीवर नाममात्र कर घेणें अशा परिस्थितींत आवश्यक होईल.

सध्यां जमीनमहसूल लहानथोर सर्वच खातेदारांना सारख्याच दरानें द्यावा लागत आहे. त्या ऐवजीं जर शेतीच्या उत्पादनावर योग्य दरानें व पद्धतीनें विक्री-कर बसवण्याची योजना सिद्ध झाली तर ज्यांचें उत्पादन फार नाहीं अशा गरीब शेतकऱ्यास आपोआप सवलत मिळून बड्या श्रीमंत जमिनदाराला मात्र यथा-प्रमाण अधिक कर द्यावा लागेल.

अशा प्रकारचे निष्कर्ष मद्रास प्रांतांतील विक्री-कर कायद्याच्या गेल्या दहा वर्षांच्या अंमलबजावणीच्या सिंहावलोकनावरून प्राप्त झालेले आहेत. त्यांचेवरून भावी काळांत सरकारी कर योजनांत विक्रीकरास अभूतपूर्व प्राधान्य मिळण्याची फार शक्यता दिसते.

(समाप्त)

## कंपनी कायद्याखालील नवा निवाडा

### अप्रासंगिक आरोप

बेळगांवकडील एका कंपनीवर व तिच्या डायरेक्टरांवर वार्षिक नफा–तोटा पत्रकाच्या व ताळेबंदाच्या तीन प्रती रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे दाखल केल्या नाहींत म्हणून कंपनी कायद्याच्या कलम १३४ (४) खालीं खटला भरण्यांत आला होता. त्यांतून मोठ्या मजेदार युक्तिवादाच्या आधारावर कंपनीची व डायरेक्टरांची सुटका झाली. कंपनीकडून व डायरेक्टरांकडून सदर आरोपा-विरुद्ध असा बचाव मांडण्यांत आला कीं, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभाच झालेली नसल्याकारणानें त्या सभेनंतर दाखल करण्याचे कागदपत्र दाखल करण्याचा प्रसंगच उद्भवला नाहीं व म्हणून कंपनीकडून व तिच्या डायरेक्टरांकडून कोणत्याच प्रकारची 'कसूर' (डिफॉल्ट) घडून आलेली नाहीं. बेळगांवच्या मॅजिस्ट्रेटनें हा बचाव ग्राह्य धरून कंपनीला व तिच्या डायरेक्टरांना सोडून दिलें. परंतु सरकारकडून त्यावर मुंबई हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें. हायकोर्टांत सरकारी वकिलांनीं असें प्रतिपादन केलें कीं, वार्षिक सर्वसाधारण सभा योग्य मुदतींत भरविणें ही जबाबदारीसुद्धां डायरेक्टरांवर असून तिच्यांत त्यांनीं कसूर केली तर कंपनी कायद्यानें कलम ७६ (२) मध्यें त्यांना शासन सांगितलें आहे. अशा स्थितींत एका अपराधाला दुसऱ्या अपराधाचा बचाव सांगून कंपनीला अथवा तिच्या डायरेक्टरांना निसटता येणार नाहीं. परंतु हायकोर्टाचें मत पडलें कीं, कंपनीवर व डायरेक्टरांवर आरोप (चार्ज) आहे तो विशिष्ट कागदपत्र दाखल केले नाहींत असा आहे. त्यावर सदरचे कागदपत्र दाखल करण्याची वेळच आलेली नव्हती असा समर्पक बचाव कंपनीनें व डायरेक्टरांनीं दिलेला आहे. यांत ते एका अपराधाच्या सबबीखालीं दुसरा अपराध क्षम्य ठरवीत आहेत असें नसून त्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, आम्हीं अन्य एखादा अपराध केला असेलहि; परंतु आरोप पत्रांत आमच्यावर ठेवण्यांत आलेला अपराध कांहीं आम्हीं केलेला नाहीं. तसा प्रसंगच अजून आलेला नाहीं! हें त्यांचें म्हणणें गैरवाजवी नाहीं व म्हणून आहे या आरोपाखालीं कंपनी व तिचे डायरेक्टर्स निर्दोषीच ठरतात.

(ए. आय्. आर. १९४८ मुंबई ३५७)

**विमान वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—ब्रिटनच्या सरकारच्या मालकीच्या तीन विमान-वहातूक कंपन्यांना गेल्यावर्षी १,१०,००००० पौंड तोटा आला. १९४६-४७ सालांत झालेल्या तोट्यापेक्षा हा तोटा १० लाख पौंडांनीं अधिक आहे. आर्थिक दृष्ट्या न परवडणारीं निरनिराळ्या प्रकारचीं विमानें आणि विमान-तळांच्या कार्यक्षमतेवर होणार खर्च ह्या दोन मुख्य कारणांमुळें हा तोटा झाला, असें तिन्हींपैकीं एका कंपनीचें मत आहे.

**जुने कागदपत्र टिकविण्यासाठी**—हिंदुस्थान सरकारनें जुने कागदपत्र टिकविण्यासाठीं अमेरिकेंत संशोधिलेल्या लॅमिनेशन प्रेसची यंत्रसामुग्री विकत घेतली आहे. ह्या प्रेसमुळें महत्त्वाचे कागदपत्र ५०० वर्षांवर, खराब न होतां, टिकविता येतात. अशा तऱ्हेची यंत्रसामुग्री हिंदुस्थानांत पहिल्यानेंच येत असून, जगांत आणखी पांचच ठिकाणीं ती आहे, असें समजतें.

## साखरेची किंमत उतरणार

डिसेंबर, १९४७ मध्यें सरकारनें साखरेवरील नियंत्रण उठवलें, त्या वेळीं साखरेची किंमत दर मणीं २० रु. १४ आ. वरून ३५ रु. ७ आण्यांवर नेमण्यांत आली. ही वाढ संयुक्त प्रांत व बिहार ह्या प्रांतांच्या सरकारचे सल्ल्यानेंच कारखानदारांनीं केली. शेतकऱ्यांना द्यावयाची उसाची किंमतहि दर मणी १ रु. १४ आ. ची २ रु. करण्यांत आली. ह्या किंमती तेव्हांपासून अंमलांत आहेत आणि साखरेची किरकोळ विक्रीची किंमत दर शेरास १५ आणे ते १ रु. कायम आहे. साखरेस वाढवून दिलेली किंमत फारच भारी आहे आणि चलनवाढीस आळा घालण्यासाठीहि ती उतरविणें आवश्यक आहे, ह्याबद्दल दुमत नाहीं असें सरकारनें जाहीर केलें आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उसास द्यावयाची किंमत कमी केल्याखेरिज साखरेची किंमत कमी करतां येणार नाहीं, हें उघड आहे. संयुक्त प्रांत सरकारनें ती आतां दर मणीं १ रु. १० आ. व बिहार प्रांत सरकारनें १ रु. १३ आ. अशी केली आहे. म्हणजे, ती अनुक्रमें ६ आ. व ३ आ. कमी झाली आहे. हिंदुस्थान सरकारनें, साखरेची किंमत दर मणी ३५ रु. ७ आ. आहे, ती आतां दरमणी २८ रु. ८ आ. करावी असें ह्या दोन प्रांतिक सरकारांनीं सुचविलें आणि ही सूचना त्यानें मान्य केली आहे. किंमत ह्याहिपेक्षा आणखी उतरवितां येईल कीं काय, ह्याचा हिंदुस्थान सरकारनें विचार केला. परंतु, उसाची किंमत, प्रांतिक सरकारांची ऊंस गाळणीवरील पट्टी, कामगारांचें वाढतें वेतन, साखरेचा वाढलेला उत्पादन खर्च, हीं सर्व लक्षांत घेऊन किंमत आणखी कमी करणें शक्य होणार नाहीं, असें त्याचें मत झालें. म्हणजे, आतां साखरेची किंमत दर शेरी १२ आ. ते १३ आ. व्हावी, अशी अपेक्षा आहे.

गिऱ्हाइकांच्या दृष्टीनें साखरेच्या किंमतीमधील हा उतार निश्चित स्वागतार्ह आहे. परंतु, महाराष्ट्रांतील साखर कारखाने मात्र त्याचें स्वागत करणार नाहींत. साखर कारखान्यांत गाळलेल्या उसावर पट्टी बसविण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें, त्याविषयींची डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनची तक्रार 'अर्था'च्या ता. २४ नोव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आली होती. ह्या पट्टीनें महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांवरील बोजांत आणखी भर पडली आहे. आतां, एकीकडे ऊस पट्टीचा करभार ह्या कारखान्यांना सरकारास द्यावा लागून, त्यांस त्यांच्या साखरेस मिळणारी रक्कम मात्र कमी होणार आहे. साखरेवर अप्रत्यक्ष रीतीनें नियंत्रण बसवून, तिची किंमत उतरविली आहे, परंतु अजूनहि ती परदेशी किंमतीपेक्षा जास्तच आहे, ही गोष्ट मात्र दृष्टीआड करून भागणार नाहीं.

### " विमा आणि व्यापार "

वरील मासिक पुणें येथें श्री. पां. सी. काणे ह्यांच्या संपादकत्वाखालीं निघतें, त्याचा दीपावलीचा व्यापार विशेषांक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रारंभींच श्री. भातखंडे ह्यांचा नवीन मासिकें काढावीं काय, ह्या विषयावरील लेख देण्यांत आला आहे. संपादनाच्या कामापेक्षा इतरच काम अधिक महत्त्वाचें व अवघड असतें, हें नव्या संपादकांच्या लक्षांत येत नाहीं. प्रस्तुत लेखांत छपाई व कागद एवढ्या पुरताच विचार केलेला आहे. श्री. वा. सी. काणे, वकील, ह्यांचा ट्रेडमार्क्सचें रजिस्ट्रेशन हा लेख हितसंबंधीं लोकांना उपयुक्त व मार्गदर्शक आहे. श्री. म. स. पारखे ह्यांचा ' कागद व्यवसाय आणि हिंदुस्थान ' हा लेख अनुभवावर आधारलेला व माहितीपूर्ण आहे. "विमा आणि व्यापार" मासिक आपल्या क्षेत्रांत चांगली कामगिरी करीत असून त्याबद्दल आम्ही त्याचें अभिनंदन करतों.

### चहाचें उत्पादन व खप

१९५० सालीं चहाचें जागतिक उत्पादन १११½ कोटी पौंड होईल व खप १०९½ कोटी टनांवर जाणार नाहीं, असा "टी अँड रबर मेल" ह्या लंडन येथील पत्राचा अंदाज आहे.

### जलप्रभेचें जलावितरण

विजागापट्टण येथील "जलप्रभा" मालवाहू आगबोटीचें जलवितरण सरदार पटेल ह्यांनीं दिल्ली येथील आयर्विन अँफिथिएटर मधून बिनतारी बटण दाबून केलें. जलप्रभा ही सिंधा कंपनीनें गेल्या सहा महिन्यांत समुद्रावर सोडलेली दुसरी ८ हजार टनी आगबोट होय. जलउषेचें जलवितरण पं. नेहरूंनीं गेल्या मार्चमध्यें केलें होतें.

### साखकारी नियंत्रण ( दुरुस्ती ) कायद्यास मंजुरी

मुंबईच्या गव्हर्नरांनीं बाँबे मनिलेंडर्स ( अमेंडमेंट ) अॅक्ट १९४८ ला मंजुरी दिली आहे.

### भाडें बुडविणारे उतारू

फेब्रुवारी ते सप्टेंबर १९४८ ह्या आठ महिन्यांत जी. आय. पी. रेल्वेवर ४,२०,३३८ बिगर तिकीट उतारूंना पकडण्यांत आलें व त्यांचेकडून जादाभाडें किंवा दंड ह्यांचे स्वरूपांत १३,८२,९६२ रु. वसूल करण्यांत आले. लगेजचा चार्ज चुकविणारे ८१,३८२ लोक सांपडले, त्यांचेकडून ३,७१,१९० रु. चार्ज वसूल झाला.

### बिस्किटांच्या यंत्रसामुग्रीचे लायसेन्स

बिस्किटें करण्याच्या यंत्रसामुग्रीच्या आयातीस यापुढें आणखी लायसेन्स न देण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. सध्या देण्यांत आलेल्या लायसेन्सनी निघणाऱ्या कारखान्यांचें उत्पादन पुरेसें होईल.

**THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE Ltd., POONA 2.**

# NOTICE.

The Fourteenth Annual General Meeting of the Share-holders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2, will be held on Sunday the 26th December 1948 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business:-

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September 1948.
(2) To sanction the payment of a Dividend for the above mentioned period.
(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.
(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By order of the Board of Directors

Poona 2
2nd December 1948. } **C. G. Agashe & Co.**

Managing Agents.

*Note*:—The Transfer Books of the Company will be closed from 11th December 1948 to 1st January 1949 ( both days inclusive ).

The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra, Ltd., Poona 2, on and after the 7th of February 1949.

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान १ रें: ८-११-४८

# ग्रामजीवन व मुंबई विधिमंडळाचें धोरण

( श्री. ना. वि. भोंडे, बी. ए., एलएल. बी. )

सहकार व्याख्यानमालेतील तिसरें व्याख्यान श्री. ना. वि. उर्फ नानासाहेब भोंडे, बी. ए., एलएल. बी., वकील यांचें पुणें सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँकेचे दिवाणखान्यांत दिनांक ८-११-४८ रोजीं सायंकाळीं झालें. व्याख्यानाचा विषय "ग्रामजीवन व मुंबई विधिमंडळाचें धोरण" हा होता. श्री. भोंडे यांनीं आपले विचार पुढीलप्रमाणें प्रदर्शित केले. ते म्हणालेः—

"ग्रामीण जीवन आणि सहकार यांचा अत्यंत निकटचा संबंध असल्यानें या विषयाचा प्रस्तुतचे आठवड्यांत विचार करणें हें सयुक्तिक होय. कोणत्याही राजकर्त्यांपुढें सर्वव्यापी असें धोरण असलें पाहिजे व तें अंमलांत आणण्यासाठी त्यास जरूर ते कायदे विधिमंडळामार्फत मंजूर करून घ्यावे लागतात आणि त्या कायद्यांची योग्य ती अंमलबजावणी होण्याचे दृष्टीनें जरूर ते आपल्या अधिकारांत कानू मंजूर करून घ्यावे लागतात. हल्लींचे राज्यकर्ते हे कॉंग्रेसच्या मतप्रणालीवर निवडून आले असल्यानें निवडणुकीचे वेळीं जाहीर केलेल्या धोरणानुसार त्यांना आपला कारभार चालवावा लागत आहे. परंतु निवडणुकीचे वेळीं जाहीर केलेल्या जाहिरनाम्याचा विचार राज्यकारभाराची धुरा आपल्यावर पडेल या भूमिकेवर आधारलेला नसल्यानें जाहिरनाम्याची पूर्तता करण्याची जबाबदारी त्यांचेवरच येईल याची जाणीव त्यावेळीं त्यांना नव्हती. अशा परिस्थितीमुळें हल्लींच्या सरकारनें अलिकडे केलेले कायदे घिसाडघाईनें व अपरिपक्व स्थितींत तयार होतात व त्यांची अंमलबजावणी ठरविलेल्या उद्दिष्टाप्रमाणें कशी घडून येईल याचा संपूर्ण विचार केल्याशिवाय मंजूर होत आहेत, असें दिसतें. उदाहरणार्थ– दारूबंदी, कुळकायदा, भाडें नियंत्रण, कर्जनिवारण, इत्यादि विषयांबाबत मंजूर झालेले कायदे हे बऱ्याच बाबतींत अपुरे आहेत. जनतेला दिलेलीं आश्वासनें शक्य तितक्या लवकर पार पाडावीत एवढ्याच हेतूनें हल्लीं आपल्या प्रांतांत तरी कायदे होत आहेत असें दिसतें. १९४७-४८ सालांत ८४ बिलें विधिमंडळांत प्रविष्ट झालीं आणि ५२ कायदे मंजूर झाले यावरून वरील विधानास पुष्टि मिळते. कायदे करतांना आगाऊच पुरा विचार होत नाहीं याचें एक उदाहरण म्हणजे रेंट, ऋणविमोचन व टेनन्सी ॲक्ट. टेनन्सी ॲक्ट सन १९३९ सालीं प्रथम मंजूर झाला. त्यांत एका वर्षाचे आंतच अनेक दुरुस्त्या कराव्या लागल्या व शेवटीं सन १९४८ सालीं पहिला कायदा रद्द करून नवीनच कायदा करावा लागला. हीच परिस्थिति कर्जनिवारण कायद्याचे बाबतींत दिसून येते. कायदा मंजूर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीनें जे कानू मंजूर करावे लागतात ते सदर कायदे विधिमंडळांत प्रविष्ट करण्याचे अगोदर सरकारजवळ तयार केलेले असले पाहिजेत. परंतु कायदा मंजूर झाल्यावर बरेच दिवसांनीं त्याबाबतचे कानू प्रसिद्ध होतात. यावरून हे कानू सरकार योग्यवेळींच तयार करीत नाहीं असें दिसतें. या सर्व परिस्थितीवरून कायदे करण्यापूर्वी त्याबाबतचा संपूर्ण व खोल विचार झालेला नसतो असें दिसून येतें.

"अलीकडील कायदे ग्रामीण जनतेच्या अधिक अधिक हिताचे व फायद्याचे कसे होतील तें पहाण्याचा प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांचा प्रधान हेतु आहे याबद्दल वाद नाहीं. उदाहरणार्थ–कसणाराची जमीन हें तत्त्व अमलांत आणण्याचे दृष्टीनें हल्लींच्या खंडकऱ्यांना शाश्वतता वाटावी व त्यांचे हातून जमिनीची निगा नीट रहावी व तिचें उत्पन्न वाढावें म्हणून त्यांना सदर जमीन कसण्यासाठी लांब मुदतीनें मिळेल अशी कायद्यानें व्यवस्था करण्यांत आली आहे. अर्थात् त्यामुळें ग्रामीण नागरिकांचें जीवन अधिक सुखकर होईल यांत शंका नाहीं. हल्लीं मंजूर होत असलेले कायदे हे क्रांतिकारक नसून उत्क्रांतिकारक तत्त्वावर आधारलेले आहेत, असा राज्यकर्त्यांचा दावा आहे.

"ग्रामीण कायद्याप्रमाणेंच कांहीं नागरी कायदेही अलिकडे मंजूर झालेले आहेत. उदाहरणार्थ–रेन्ट ॲक्टमुळें हल्लींच्या भाडेकऱ्यांना पुष्कळ दिवस हल्लींच्या जागेंत रहाण्याची शाश्वतता मिळेल अशी तजवीज झालेला आहे.

"वेगवेगळ्या कायद्यांचें ध्येय विस्तृत असलें तरी त्यांची अंमलबजावणी होऊं शकत नाहीं. सर्व ग्रामीणांना सक्तीनें शिक्षण द्यावयाचें असल्यास हल्लींची विद्यार्थ्यांची संख्या १६ लक्षांऐवजी ३२ लक्ष होईल व त्यासाठीं जादा ४० हजार शिक्षक लागतील. प्रत्यक्ष वस्तुस्थिति पहातां गेल्या वर्षी १ ते १½ लाखानें विद्यार्थ्यांत वाढ झाली. याच प्रगतीनें पुढील वाढ व्हावयाची असल्यास सक्तीच्या शिक्षणाचें ध्येय गांठण्यास एक पिढीचा काळ लागेल.

"नवीन विहिरी पाडणें अगर जुन्या विहिरी खोल करणें यासाठी अंदाजपत्रकांत २ कोटींची तरतूद करण्यांत आली असतां त्या कामीं चालू सालीं फक्त २८ लक्ष रुपये खर्च झाले यावरून कायदे अगर कानूंची अंमलबजावणी कसोशीनें होत नाहीं असेंच निदान निघतें.

"सध्याचें सरकार जनतेचें सरकार असल्यानें त्यास पाठिंबा देणें हें आपल्या सर्वांचें कर्तव्य आहे. तरीपण त्याच्या कारभारांत कांहीं चुका, उणीवा अगर घिसाडघाई होत असेल तर ती राजकर्त्यांचे नजरेस आणणें हेंही आपलें तितक्याच महत्त्वाचें कर्तव्य आहे. जनतेचें सरकार आहे म्हणून त्यास विरोधी पक्ष नसावाच हें म्हणणें बरोबर नाहीं. असा विरोधी पक्ष आल्याशिवाय राज्यकर्त्यांच्या चुका त्यांच्या नजरेस निर्भिडपणें आणल्या जात नाहींत आणि तसें झाल्याशिवाय कायदे निर्दोष होणार नाहींत. मात्र, सरकारवर टीका करतांना ती दोषिक बुद्धीनें न होतां ग्राहक बुद्धीनें व्हावी आणि संघर्ष निर्माण होणार नाहीं याची काळजी घ्यावी. तसेंच, मिळालेलें स्वराज्य हें सुराज्य कसें होईल या ध्येयानें प्रेरित होऊन सर्वांनीं खटपट करावी एवढीच माझी जनतेस विनंति आहे."

---

लोकमान्य इंडस्ट्रीज लि. पुणें,

वरील कंपनीची स्टॅच्युटरी सभा रविवार, ता. १२ डिसेंबर रोजीं कंपनीच्या कचेरींत भरणार आहे. कंपनीच्या शेअर विक्रीच्या पोटीं एकूण ४५,२९५ रुपये जमा आहेत. प्राथमिक खर्चाचा प्रॉस्पेक्टसमधील अंदाज ५,००० रु. होता, परंतु प्रत्यक्ष खर्च ४,३२२ रुपयेच झाला आहे. शेअर विक्रीवर २,८३२ रुपये कमिशन देण्यांत आलें. कंपनीनें मशिनरीसाठी ७,०१० रु. ॲडव्हान्स दिले आहेत. ( चेअरमनः रा. ब. जी. जी. शेंबेकर; मॅनेजिंग एजंटसः मेसर्स डब्ल्यु. एन. कलंत्रे आणि कं. )

---

पाकिस्तान सरकारचा कोळशाचा शोध—देशांत कोळसा कोठें सांपडूं शकेल, त्याची तपासणी करवून घेण्यासाठी पाकिस्तान सरकार एका ब्रिटिश कंपनीला पाचारण करणार आहे असें समजतें. पाकिस्तान सरकार आणि ही ब्रिटिश कंपनी ह्यांच्यांत लवकरच तद्विषयक एक करार करण्यांत येणार आहे.

## १९४७–४८ सालांतील कापसाचा अंदाज

हिंदुस्थानांतील कापसाच्या पिकाचा, १९४७–४८ सालांतील अंदाज हिंदुस्थान सरकारच्या शेतकी खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आला आहे. लागवडीच्या क्षेत्रांत हैद्राबाद संस्थानाचाही समावेश करण्यांत आलेला आहे. कापसाच्या लागवडीखालील एकूण जमीन १,०९,३२,००० एकर होती. या जमिनींतून प्रत्यक्ष पीक २१,१६,००० गांठी आलें. गतवर्षीच्या मानानें वरील आकड्यांत अनुक्रमें ६·३ टक्के व ०·४ टक्के घट झालेली दिसून येते.

| | क्षेत्र ( एकर ) | गांठी |
|---|---|---|
| बंगाल | ८,२४,००० | २,१५,००० |
| अमेरिकन्स | २,०८,००० | ३३,००० |
| उमरा | ३९,३९,००० | ७,२७,००० |
| भडोच | ५,५२,००० | १,४९,००० |
| सुरती | ३,४९,००० | ७७,००० |
| धोलरा | ९,४२,००० | १,७७,००० |
| इतर | ४१,१८,००० | ७,३८,००० |

## बँकांवर बंधन घालणारा पाकिस्तानी ऑर्डिनन्स

पाकिस्तानच्या नव्या ऑर्डिनन्सप्रमाणें सर्व परकीय बँकांनीं नव्या शाखा उघडण्यास किंवा जुन्यांची जागा बदलण्यास स्टेट बँक ऑफ पाकिस्तानची आगाऊ परवानगी घेतली पाहिजे. अखंड हिंदुस्थानच्या फाळणीनंतर पाकिस्तानांत ज्या बँका किंवा त्यांच्या शाखा बंद पडल्या, त्यांसहि हा ऑर्डिनन्स लागू आहे. बंद पडलेल्या शाखा सुरू करण्यासहि त्यांना परवानगी घ्यावी लागेल. पाकिस्तानांत मुख्य कचेरी असलेल्या बँकांना हें नियंत्रण अगोदरच लागू होतें.

## जखमा बांधण्याकडे नायलॉनचा उपयोग

मोजे, टुथब्रश इत्यादींसाठी नायलॉनचा उपयोग करण्यांत येतो, हें सुप्रसिद्धच आहे. जखमा बांधण्याकडेहि त्याचा उपयोग लवकरच केला जाण्याचा संभव दिसतो. नायलॉनचें बँडेज जखम बरी होईपर्यंत हालविण्याचें कारण नाहीं. जंतु, धूळ व ओलावा दूर ठेवून नायलॉन घामास बाहेर जाऊं देत असल्या कारणानें, शहराची कातडी कोरडी व स्वच्छ राहूं शकते.

## सातारा जिल्हा सें. को. बँकेची स्थापना

सातारा जिल्हा सें. को बँक काढणेसंबंधीं विचार करण्यासाठी को. सु. यु. बोर्डानें पुढाकार घेऊन ता. १३ नोव्हेंबर रोजीं एक प्रातिनिधिक सभा बोलविली व तींत व ता. २९ रोजीं बोर्डाच्या कचेरींत सभा घेण्याचें ठरलें; त्याप्रमाणें प्रेसिडेंट श्री. धोंडजी पांडुरंग पाटील ह्यांच्या सहीनें पत्रक काढण्यांत आलें.

## पुणें विद्यापीठ कोर्टाकरितां उमेदवार

खालील बँकांचे चेअरमन कोर्टाकरितां, अर्थात् व्यक्तिशः नात्यानें उभे आहेत.

( १ ) श्री. धों. कृ. साठे, चेअरमन बँक ऑफ महाराष्ट्र, पुणें
( २ ) श्री. के. वि. केळकर, ,, भारत इं. बँक, पुणें
( ३ ) श्री. पु. पां. गोखले, ,, अर्बन को. बँक, कराड
( ४ ) श्री. द. ग. येरवडेकर, अध्यक्ष, को. रुपी बँक, पुणें

## नवी घटना २६ जानेवारीस मंजूर होणार ?

घटनासमितीनें घटना २६ जानेवारी रोजीं मंजूर करावी व त्यापूर्वी सर्व चर्चा संपविण्यांत यावी, असे घटनासमितीमधील कॉंग्रेस पक्षानें ठरविलें आहे. आतांपर्यंत घटनासमितीवर ५७ लक्ष रुपये खर्च झाला आहे.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार










हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.